उत्कृष्ट क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००
संस्थापक - लोकमित्र भाई मदाने
WWW.APLAMAHARASHTRA.IN
POST REGD.NO./DHL/53/24-26
संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२१९ ■ बुधवार १३ मे २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

## नीटच्या पेपर फुटी प्रकरणी नाशिकचा तरुण गजाआड
## विरोधी पक्ष आक्रमक : विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट

**नाशिक, दि. १२ : वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्यासाठी नीट परीक्षा दिलेल्या देशभरातील २२ लाख विद्यार्थ्यांना केंद्राने झटका दिला. कारण, पेपर फुटीप्रकरणामुळे यंदा तीन मेस घेण्यात आलेली परीक्षा रद्द करण्यात आली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून हा निर्णय जाहीर करण्यात आला. परीक्षेची नवी तारीख पुन्हा जाहीर होईल. सुमारे २२ लाख विद्यार्थ्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले असून तणाव आणि चिंता व्यक्त होत आहे. याप्रकरणी, आता सीबीआयला नाशिक ते राजस्थान व्हाया हरियाणा अशा पद्धतीने ही साखळी असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. विशेष म्हणजे नाशिकमध्ये नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटली असून तीस वर्षीय युवकाला अटक करण्यात आली आहे.**

नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणात नाशिक पोलिसांच्या गुन्हे शाखेने नाशिकमध्ये राहणाऱ्या तीस वर्षीय युवकाला अटक केली आहे. संशयित आरोपी शिक्षित असून तो मूळचा नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील रहिवासी आहे. राजस्थानकडून मिळालेल्या माहितीनुसार, नाशिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली. आज दुपारी बारा वाजेच्या सुमारास संशयिताला (पान ४ वर)

### विद्यार्थ्यांच्या भविष्याचा मोदींकडून खेळ : गांधी

नवी दिल्ली : नीट परीक्षा रद्द झाल्यानंतर लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकार आणि भाजपवर तीव्र शब्दांत हल्लाबोल केला आहे. पेपर लीकप्रकरणामुळे




२२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे स्वप्न उद्ध्वस्त झाल्याचा आरोप करत त्यांनी या संपूर्ण प्रकाराला तरुणांच्या भविष्यासोबतचा गुन्हा असे संबोधले.

राहुल गांधी यांनी म्हटले की, देशभरातील लाखो विद्यार्थ्यांनी रात्रंदिवस अभ्यास करून, कुटुंबांनी कर्ज काढून आणि आई-वडिलांनी दागिने विकून मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. मात्र त्यांना बदल्यात मिळाले ते पेपर लीक, भ्रष्टाचार आणि प्रशासनिक गोंधळ. ही केवळ प्रशासकीय चूक नसून देशातील प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या भविष्याशी केलेला गंभीर अन्याय आहे, असा आरोप राहुल गांधी यांनी केला. प्रत्येक वेळी पेपर लीक प्रकरणात (पान ४ वर)

### हिमंता बिस्वा सरमांकडे आसामचे मुख्यमंत्रीपद

गुवाहाटी, दि. १२ : आसाम विधानसभा निवडणुकीत



भाजपच्या मोठ्या विजयानंतर आज मंगळवारी हिमंता बिस्वा सरमा यांनी दुसऱ्यांदा राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. आसाममध्ये सलग दोन वेळा मुख्यमंत्री बनणारे ते पहिले बिगर-काँग्रेसी नेते ठरले. गुवाहाटी येथे शपथविधी सोहळ्यात राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांनी त्यांना शपथ दिली. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपशासित अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री उपस्थित होते.

आसाममध्ये एनडीए सरकारची ही सलग तिसरी टर्म आहे. यापूर्वी (पान ४ वर)

## अण्णा द्रमुकमध्ये फूट, षण्मुगम गटाचा टीव्हीकेला पाठिंबा; विजय थलपतींना पार्टीची स्थिती भक्कम

**चेन्नई, दि. १२ : तामिळनाडूच्या विधानसभा निवडणुकीत अभिनेते विजय थलपती यांच्या टीव्हीके पक्षाने यश मिळविले. मात्र बहुमताने हुलकावणी दिल्याने विजय यांच्या सत्तास्थापनेच्या मार्गात काही अडथळे आले होते. त्यावर मात करत विजय यांनी काँग्रेस आणि इतर छोट्या पक्षांच्या साथीने बहुमताची जुळवाजुळव करत मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. पण काठावरचे बहुमत असताना विजय हे कसा कारभार करू शकतील, असा प्रश्न राजकीय वर्तुळातून विचारला जात होता. परंतु, आता विजय आणि त्यांच्या पक्षाला मोठा दिलासा देणारी घटना तामिळनाडूच्या राजकारणात घडली आहे. तामिळनाडूमधील प्रमुख पक्षांपैकी एक असलेल्या अण्णा द्रमुक पक्षातील एका गटाने विजय यांना पाठिंबा जाहीर केला आहे.**



तामिळनाडू विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर अण्णा द्रमुक पक्षात मुख्यमंत्री विजय यांच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी टीव्हीके पक्षाला पाठिंबा देण्यावरून आमदारांमध्ये दोन गट पडले आहेत. त्यातील षण्मुगम गटाने विजय यांना पाठिंबा देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. याबाबत अण्णा द्रमुकचे नेते सी. व्ही. षण्मुगम यांनी सांगितले की, आम्ही या निवडणुकीत विजयी झालेल्या टीव्हीकेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही डीएमकेसोबत आघाडी केली असती तर एआयडीएमकेचे अस्तित्वच संपुष्टात आले असते. सध्या आम्ही कुठल्याही आघाडीविना उभे आहोत. आमच्या पक्षाला पुन्हा एकदा भक्कम बनवण्यावर आमचे लक्ष आहे. त्यामुळे आम्ही टीव्हीकेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

आम्ही अण्णा द्रमुक पक्षाची स्थापना ही डीएमकेच्या विरोधात केली होती. (पान ४ वर)

## विहीर अनुदानाची रक्कम देण्यासाठी सात हजाराची लाच घेणारा अटकेत

**धुळे, दि. १२ : राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर विहिरीचे शिल्लक एक लाख साठ हजार ६१० रूपयांचे अनुदान देण्यासाठी सात हजाराची लाच मागण्यात आली. वरिष्ठांच्या नावे लाच स्विकारणारा धुळे पंचायत समितीमधील तांत्रिक सहाय्यक विश्वजित संजय भामरे याला अटक करण्यात आली आहे. तक्रार दाराने दिलेली तक्रार लक्षात घेऊन लाच लुचपत प्रतिबंध विभागाने सापळा रचला आणि त्याला अटक केली आहे.**



शासनाकडून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत २०२३-२४ मध्ये धुळे तालुक्यातील नंदाळे येथील शेतकरी महिलेस विहीर मंजूर झाली होती. विहीर खोदण्यासाठी संबंधीत महिलेस एकूण तीन लाख ९९ हजार १६० रूपयांचे अनुदान मंजूर झाले होते. त्यापैकी २ लाख ३९ हजार रूपयांचे अनुदान संबंधीत महिलेच्या खात्यावर वर्ग झाले. विहिरीचे काम झाल्यानंतर आता उर्वरित एक लाख साठ हजार ६१० (पान ४ वर)

### हाडाखेडला प्लायवूडचा ट्रक जळून खाक

शिरपूर दि.१२ (का. प्र.) : तालुक्यातील हाडाखेड गावाजवळ गुरुद्वारासमोर अकरा मेस धावत्या ट्रकने अचानक पेट घेतला. या घटनेत ट्रकसह त्यात भरलेले प्लायवूड जळून खाक झाले. सुदैवाने चालक व क्लिनर यांनी वेळीच बाहेर उडी टाकल्याने ते बचावले.

मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गावरून मध्य प्रदेशातून पळासनेर मार्गे हा ट्रक महाराष्ट्रात येत होता. हाडाखेड गावाजवळ पोहोचल्यावर ट्रकच्या समोरील भागातून दूर बाहेर पडत असल्याचे चालकाच्या लक्षात आले. त्याने ट्रकवर नियंत्रण मिळवून रस्त्याच्या कडेला उभा केला. त्याच वेळी ट्रकला (पान ४ वर)

## खर्चात वाढ झाल्याने कृषी उत्पादकांना दरवाढ मिळण्याची शेतकऱ्यांना अपेक्षा

**धुळे, दि. १२ (प्रतिनिधी) : धुळ्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीत सध्या उन्हाळी पिकांची मोठ्या प्रमाणावर आवक सुरू झाली आहे. यामध्ये प्रामुख्याने उन्हाळी भुईमूग शेंगा, मका, ज्वारी आणि बाजरी या पिकांचा समावेश आहे. सध्याचा दर सर्वसाधारण आहे. पण, उत्पादन खर्च आणि होत असलेली मेहनत लक्षात घेता शेतीमालास दरवाढ हवी, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सध्या उन्हाळी शेतीमाल बाजारात आला आहे. त्याची सर्वसाधारण किंमत विक्री होत आहे. त्यामुळे शेतकरी आणि खरेदीदार समाधानी आहेत, असा सूर बाजार समितीचे संचालक विजय चिंचोले यांनी लावला.**

धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीत धुळे तालुक्यासह अन्य शेतकरी शेतीमाल विक्रीस आणतात. खरीप हंगाम तोंडावर आल्याने शेतकरी पुर्वतयारी करताान उन्हाळी हंगामातील शेतीमाल विकण्याचा प्रयतक करीत आहेत. सध्या उन्हाळी हंगामातील ज्वारी, बाजरी, मका, भूईमुगाची बाजार समितीत मोठ्या प्रमाणात आवक (पान ४ वर)

### शिरपुराला एकास बावीस ह. लुबाडले

शिरपूर दि.१२ (का. प्र.) : एटीएम कार्डची अदलाबदल करून एकाला २२ हजार रुपयात लुबाडल्याची घटना शहरातील निमझरी नाक्यावर घडली. याबाबत अज्ञात भामट्यांविरोधात शिरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत दिनेश शांतीलाल राजपूत (वय ५८) यांनी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. ते शहरातील शास्त्री कॉलनीत राहतात. सहा मे रोजी बँकेचा हप्ता भरण्यासाठी एटीएम मधून पैसे काढण्यासाठी ते निमझरी नाक्यावर एसबीआयच्या एटीएम सेंटरमध्ये गेले होते. तेथून १७ हजार रुपये काढून परत जात असताना दोन संशयितांनी त्यांच्याकडील (पान ४ वर)

## चुका तुमच्या, त्याचा भुर्दंड जनतेला का? मन की बात खूप झाली, ठाकरेंचे पत्र

**मुंबई, दि. १२ : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी जनतेला सोने खरेदी करू नका, वर्षभर परदेशातील प्रवास करू नका असे उपदेश केले. मोदींच्या या आवाहनानंतर विरोधक आक्रमक झाले आहेत. याच मुद्यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सुद्धा सोशल मीडियाच्या माध्यमातून पंतप्रधानांच्या या आवाहनांवर अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. चुका तुमच्या आणि त्याचा भुर्दंड जनतेला का? असा असा प्रश्न विचारला आहे. तुमची मन की बात खूप झाली. आता**



**अभ्यासकांचे आणि नागरिकांचे समजून घ्या, असे म्हणत राज ठाकरे यांनी मोदींवर आगपाखड केली आहे.**

काल पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या उपदेशानंतर जनतेमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज फेसबुक, प्लॅटफॉर्म या सोशल मीडियावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आणि त्यांनी केलेल्या आवाहनांबाबत भलीमोठी पोस्ट केली आहे. या पोस्टमधून त्यांनी (पान ४ वर)

### रोटरी फेमिनातर्फे शवपेटीचे लोकर्पण

धुळे, दि. १२- रोटरी डिस्ट्रिक्ट ३०६० च्या सहकार्याने प्राप्त झालेल्या लास्ट बेड (शवपेटी) चे लोकार्पण आज दुपारी आयुर्वेद महाविद्यालय, देवपूर धुळे येथे संपन्न झाले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पीडीजी आशिष अजमेरा, डीजीएन आशिष पटवारी, रोटरी क्लब ऑफ धुळे कनेक्ट चे भावी अध्यक्ष संतोष बिरारी, श्याम अग्रवाल उपस्थित होते. तसेच या प्रसंगी फेमिना क्लब अध्यक्षा कमल अग्रवाल, सचिव मेघा कामेरकर, डॉ रानू अजमेरा, सुरेखा वाणी, नेहा मेहता, सुनिता बहाळकर, कु. साजेदा शेख, क्लबचे इतर मान्यवर सदस्य उपस्थित होते. समाज सेवेसाठी हा लास्ट बेड हा (पान ४ वर)

## हिरे मेडिकलची पहाणी करून समस्या सोडवा मंत्री हसन मुश्रीफांना प्रा.शरद पाटीलांचे साकडे

**धुळे, दि.१२ - धुळे येथील शासकीय भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालय विविध समस्यांनी ग्रस्त झाले असून या महाविद्यालयाची पहाणी करून विविध विकास कामांचा आढावा घ्यावा यासाठी राज्याचे वैद्यकीय, शिक्षण व संशोधन मंत्री मा. ना. हसनजी मुश्रीम सो. यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते व माजी आमदार प्रा.डॉ. शरद पाटील यांनी धुळे जिल्हा भेटीचे आमंत्रण दिले. मा. मंत्री महोदय लवकरच धुळे जिल्ह्याचा दौरा करणार असून हिरे वैद्यकीय महाविद्यालयाची**



**पहाची करून विकास कामांचा व समस्यांचा आढावा घेणार आहेत अशी माहिती प्रा. डॉ. पाटील यांनी दिली.**

हिरे वैद्यकीय महाविद्यालय हे धुळे जिल्ह्याचे वैद्यकीय क्षेत्राची अस्मिता ठरत आहे. या महाविद्यालय व रूग्णालयात धुळे, जळगांव, मालेगांव, नंदुरबार येथून शेकडो रूग्ण उपचारासाठी येत असतात. सदर महाविद्यालय हे ट्रॅफीक आयलँडवर बसले असल्याने अनेक अपघातांच्या केसेसही या रूग्णालयात दाखल होत असतात. सदर महाविद्यालयात मोठया प्रमाणात कर्मचारी वर्ग असून काही वरिष्ठ कर्मचारी खालील कर्मचाऱ्यांशी अरेरावीने वागत असल्याने कामामध्ये व्यत्यय येत असतो. त्यामुळे वैद्यकीय यंत्रणा कोलमडून पडते. गेल्या २० दिवसापुर्वी येथील वरिष्ठ अधिपरिचारीका श्रीमती अरूणा भराडे यांनी एका महिला कर्मचाऱ्याला मारहाण केल्याचे प्रकरण (पान ४ वर)

### आत्महत्येस प्रवृत्त केले अटकपूर्व अर्ज नामंजूर

धुळे, दि. १२- धुळे येथील महाराणा प्रताप हायस्कूल परिसरात अभियंता तरुणाने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली होती. आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव श्याम पाटील असे होते व सदरील घटनेबाबत देवपूर पोलिस ठाणे सदरील बाबीचा गुन्हा नोंदवण्यात आलेला होता व पोलिसांच्या तपासादरम्यान मृत श्याम पाटील याने इंग्रजीत त्याच्या मरण्याच्या आधी त्याच्या मरणाच्या कारणाची चिठ्ठी लिहिलेली होती जर त्याने आरोपी शशीकांत लोखणे, रेखा लोखणे व भावेश लोखणे हे त्याच्या मृत्यूला कारणाभूत आहे व त्यांच्या छळाला कंटाळून श्याम पाटील याने गळफास घेतलेला आहे असे नमुद (पान ४ वर)



## नंदुरबारपासून जनजागृती मोहीम लाच देणे-घेणे गंभीर गुन्हा- सीबीआय

**नंदुरबार, दि.१२ (प्रतिनिधी) - शासकीय कार्यालयांमध्ये काम करून घेण्यासाठी लाच मागितली जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत असून, लाच देणे व घेणे हा गंभीर फौजदारी गुन्हा असल्याची जनजागृती करण्यासाठी केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) व लाचलुचपत प्रतिबंधक शाखा, पुणे कार्यालयाच्या वतीने विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेची सुरुवात नंदुरबार जिल्ह्यापासून करण्यात आली आहे.**

सीबीआयचे सहाय्यक पोलीस अधीक्षक आर.एन. प्रसाद व पोलीस उपअधीक्षक आर.के. जोशी यांनी सोमवारी शहरातील व्यापारी संघटनांच्या (पान ४ वर)

### लवांडे हल्ला प्रकरणी शिंदखेड्यात निषेध

धुळे, दि. १२ (प्रतिनिधी) : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विलास लवांडे यांच्यावर वारकरी संप्रदायात घुसखोरी करीत हल्ला करणाऱ्यांचा आम्ही निषेध करतो. शासनाने हल्लेखोरांवर कठोर कारवाई केली पाहिजे, अशी मागणी करीत शिंदखेड्यात निदर्शने करण्यात आली. पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी पोलिस ठाण्याजवळ निदर्शने करीत निरिक्षकांना निवेदन दिले.

शिंदखेडा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारचंद्र पक्षाच्यावतीने पोलीस निरीक्षकांना निवेदन दिले. जिल्हाध्यक्ष जितेंद्र मराठे यांच्या नेतृत्वात पदाधिकाऱ्यांनी प्रवक्ते विलास लवांडे (पान २ वर)

## धुळ्यात १५ मे रोजी प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन : रोजगाराची सुवर्णसंधी

**धुळे, दि. १२ : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, धुळे आणि मॉडेल करिअर सेंटर यांचेमार्फत शुक्रवार, १५ मे, २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ यावेळेत जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, धुळे प्रशासकीय संकुल, जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, धुळे येथे वित्त क्षेत्रासाठी प्लेसमेंट ड्राईव्ह २ (जागेवर निवड) आयोजन केले आहे. अशी माहिती कौशल्य विकास रोजगार व उद्योजकताचे प्रभारी सहायक आयुक्त चंद्रकांत दुसाने यांनी शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.**

नोकरीच्या शोधात असलेल्या धुळे जिल्ह्यातील युवक-युवतींना विविध खासगी कंपन्या, कारखाने, उद्योग-व्यवसाय आणि आस्थापना यांचेकडील रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे. यासाठी विविध कंपनीत १०० रिक्तपदे प्राप्त झालेली आहे. याकरीता नोकरीस इच्छुक पात्रताधारक उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येवून त्यांची जागेवरच निवड करण्यात येणार आहे.

नोंदणी कशी कराल ?

धुळे जिल्ह्यातील नोकरी इच्छुकांनी या संधीचा लाभ व अधिक माहिती घेण्यासाठी विभागाच्या https://www.rojgar.mahaswayam.gov.in/ या वेबसाईटला भेट द्यावी. यापूर्वी नोंदणी केली नसल्यास प्रथम आपली नोंदणी करावी आणि होम पेज वरील नोकरी साधक लॉगिन मधून आपल्या युजर आयडी व पासवर्डच्या आधारे लॉगिन करावे. त्यानंतर डॅशबोर्ड मधील पडित दीनदयाळ उपाध्याय जॉब फेअर या बटनावर क्लिक करून धुळे जिल्हा निवडून त्यातील प्लेसमेन्ट ड्राईव्ह २ (२०२६-२७) धुळे याची निवड करावी. उद्योजक / नियोक्तानिहाय त्यांच्याकडील रिक्त पदांची माहिती घ्यावी. याप्रमाणे आवश्यक किमान पात्रता धारण करीत असल्याची खात्री करून उपलब्ध असलेल्या रिक्त पदासाठी ऑनलाईन पद्धतीने आपला पसंती क्रमांक नोंदवावा. आणि किमान दोन प्रतीत बायोडाटासह फोटो, आधारकार्ड, सेवायोजना नोंदणी कार्ड, शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता इत्यादी कागदपत्रे देण्यासाठी प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित रहावे. असे आवाहन करण्यात आले आहे.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,40,150 रु.+3% GST
सोने- 24 K -1,53,000 रु.+3% GST
चांदी- 2,75,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

### राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेसाठी नंदुरबार जि.संघ शिरपूरला रवाना

नंदुरबार, दि.१२ - शिरपूर येथे होणाऱ्या १५ वर्षांतील मुले राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धे साठी नंदुरबार जिल्हा फुटबॉल असोसिएशन चा संघ रवाना.... कर्णधार रोहित शिरसाठ, उप-कर्णधार कार्तिक सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली अनंत सोनार, धनंजय साळवे, आदित्य शर्मा, नचिकेत सूर्यवंशी,सुमित माळी, कार्तिक पाटील, प्रणव पाटील, मोहित चौरे, ईशान परदेशी, सुयोग वळवी, निल काकडे,समर्थ पाटील, सोहम अहिरे हमदान शेख, ललित मोरे, (पान २ वर)

## हिरे शासकीय रूग्णालयात उष्माघात नियंत्रण कक्ष कधी : शिवसेना ठाकरे पक्षाची विचारणा


**धुळे, दि. १२ (प्रतिनिधी) : शहराच्या दक्षिणेस असलेल्या हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात समस्या कायम आहेत. वारंवार तक्रारी करूनही रूग्णांना हालअपेष्टांना सामोरे जावे लागत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांना अनेकदा समस्या लक्षात आणून दिल्या. दुपारच्या सत्रानंतर रूग्णालय प्रशिक्षण घेत असलेल्या डॉक्टरांकडे सोपविले जाते. त्यामुळे रूग्णांना रामभरोसे उपचार घ्यावे लागतात. उन्हाळा अंतिम टप्प्यात आला तरी या रूग्णालयात उष्माघात नियंत्रण कक्ष का नाही, अशी विचारणा शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केली आहे.**



शहरासह जिल्ह्याच्या तापमानाचा पारा गेल्या दोन दिवसांपासून ४४ अंशावर गेला आहे. तसेच काही आठवड्यांपासून तापमान चाळीस ते त्रेचाळीस अंशाच्या दरम्यान असल्याने हवेत कोरडेपणा वाढला आहे. त्यामुळे उन्हाचा त्रास सकाळी नऊ पासून जाणवतो. असे असताना शहराजवळ असलेल्य हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रूग्णालयात उष्माघात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आलेला नाही. रूग्णालयात अनेक गैरसोयी आहेत. रूग्णालयातील अपघातग्रस्त रूग्णांची उपचार व्यवस्था, शस्त्रक्रिया विभाग चुकीच्या ठिकाणी आहेत. त्यामुळे दाखल झाल्यापासून रूग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना गैरसोयींचा सामना करावा लागतो. सध्या तापमान वाढलेले असूनही उष्माघात नियंत्रण कक्ष नसल्याने शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी रूग्णालय प्रशासनास निरनिराळ्या समस्यांचे निवेदन दिले. दुपारच्या सत्रानंतर रूग्णालयात केवळ प्रशिक्षण घेणारे डॉक्टर असतात. त्यामुळे रूग्णांना रामभरोसे (पान ४ वर)

## माजी मंत्री डॉ. गावितांच्या प्रकृतीत सुधारणा; उपचारानंतर घरी परतले

**नंदुरबार, दि.१२ - माजी मंत्री डॉक्टर विजयकुमार गावित यांच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली असून उपचारानंतर ते घरी परतले आहेत. गेल्या चार महिन्यांपासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांच्या प्रकृतीबाबत कुटुंबीयांसह समर्थक आणि कार्यकर्त्यांमध्ये चिंतेचे वातावरण होते.**



या कठीण काळात कुटुंबीयांनी मोठा मानसिक संघर्ष अनुभवला. अखेर उपचारांना सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर डॉक्टर विजयकुमार गावित यांना घरी आणण्यात आले. त्यांच्या घरी परतण्याने कुटुंबीयांसह समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत माजी खासदार डॉक्टर हिना गावित यांनी भावनिक शब्दांत भावना व्यक्त केल्या. त्या म्हणाल्या, गेल्या चार महिन्यांत संपूर्ण कुटुंब मोठ्या संकटातून गेले. आई, मी आणि माझी लहान बहीण सतत बाबांच्या प्रकृतीसाठी प्रार्थना करत होतो. रुग्णालयातील प्रत्येक दिवस मानसिकदृष्ट्या (पान २ वर)



## लामकानीत दहा लाखांचा काँक्रिटचा रस्ता आ.राम भदाणेंच्या प्रयत्नातून साकार होणार

**धुळे,दि.१२ - धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे यांच्या जिल्हा वार्षिक योजना नागरी सुविधा अंतर्गत मंजूर झालेल्या दहा लाख रुपये निधीतून लामकानी येथील गावांतर्गत रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ आज ज्येष्ठ नागरिक नरहर येवले यांच्या हस्ते करण्यात आला.**

प्रभाग क्रमांक एक मध्ये राम मंदिरापासून ते होळी चौकाकडे जाणाऱ्या या रस्त्याची गेल्या अनेक वर्षांपासून मागणी होती. ग्रामस्थांनी आमदार राम भदाणे यांच्याकडे मागणी केल्यानंतर त्यांनी तत्परतेने निधी उपलब्ध करून दिला. काम सुरू झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून आमदारांचे आभार मानले आहेत.यावेळी नरहर येवले यांनी सांगितले की, (पान २ वर)

## शहादा-मंदाणे रस्त्यावर पिकअपच्या धडकेने दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

**शहादा,दि.१२(का.प्र.)- शहादा ते मंदाणे या मार्गावरील अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाहीये. सहा दिवसांपूर्वीच कवळीथ येथील एका तरुणाचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच, आज पुन्हा डोंगरगावजवळ झालेल्या भीषण अपघातात कवळीथ येथील ५३ वर्षीय रावण हंबर पाटील यांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार रावण पाटील हे शहादा येथून आपले काम आटोपून दुपारी १२ वाजेच्या सुमारास दुचाकी क्रमांक एमएच १८ टी ५१२२ ने आपल्या कवळीथ गावाकडे जात होते. दरम्यान, डोंगरगाव जवळील खडी मशीनसमोर केळी भरून शहादाकडे येणाऱ्या मालवाहतूक पिकअप क्रमांक एमएच ३९ एडी २४११ ने त्यांच्या दुचाकीला जोरात धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की दुचाकीचा अक्षरशः चक्काचूर झाला असून तिचे चाक निखळून बाहेर पडले. या भीषण अपघातात रावण पाटील यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच शहादा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील यांनी पथकासह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी घटनेचा पंचनामा करत रस्त्यावरील विस्कळीत झालेली वाहतूक सुरळीत केली (पान २ वर)

जांभुळ ज्युस मिळेल


नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या जांभळा पासून तयार केलेला रस (ज्युस) उपलब्ध आहे. कोणताही रंग, संरक्षक (प्रिझर्व्हेटीव्ह), पाणी न टाकता बनवलेला जांभळाचा शुद्ध रस (ज्युस) 200.MLच्या काचेच्या बाटलीत उपलब्ध आहे.
संकेत नित्या फार्म
जनशक्ती बिल्डींग दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग- धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६

# आपला महाराष्ट्र

## देशाच्या प्रतिष्ठेला धक्का लावणारी बंगालची निवडणूक

नुकत्याच संपन्न झालेल्या राज्यांच्या विधानसभा निवडणुकांनी पाच राज्यांचा मतदार असलेल्या सामान्य नागरिकासमोर, राजकीय टोळ्यांचे पितळ उघडे पाडले आहे . केंद्र सरकारच्या नेतृत्वाखालील पक्षाच्या निवडणुकीतील कारवाया लक्षात घेता असे दिसून आलेले आहे की, त्यांना नागरिक आणि पाच वर्षांनी येणाऱ्या निवडणुकीतील मतदाराची काहीही पर्वा नाही. अशा परिस्थितीत प. बंगालच्या निवडणुकीतील कारवाया लक्षात घ्याव्या लागतील काहीही करून सत्ता हस्तगत करण्याचे सगळे उपाय शासक पक्षाने अमलात आणले.त्यातून आणखी एक हेमंत बिस्व सरमा उदयाला आला.अशा प्रकारच्या नव नेतृत्वाची पैदास करून विभाजन वादी लोकांच्या हातात राज्ये देणे हे या पक्षाचे मुख्य धोरण आहे. त्या दिशेने त्यांची वाटचाल सुरू आहे.शरमेने मान खाली घालावी लागणे हा या निवडणुकीचा निष्कर्ष आहे.देशाची प्रतिष्ठा गमावून बसलेली बंगालची निवडणूक होती. निर्लज्जम सदा सुखी अशी ज्यांची वागणूक आहे अशांनी या देशाचा नायनाट करण्याचा विडा उचललेला दिसतो. नेहमी प्रमाणे ही निवडणूक लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव म्हणून बघितली गेली. तशीच प्रसिध्दी झाली.पण निवडणुकीचा अर्थ केवळ सरकार निवडणे हा नसून, जनतेची इच्छा, अधिकार आणि सहभागाचा आदर करणे हा देखील आहे. गेल्या काही वर्षांपासून निवडणूक प्रक्रियेदरम्यान धनशक्ती, दडपशाही प्रशासकीय दबाव आणि संस्थांच्या दुरुपयोगाच्या ज्या घटना समोर येत आहेत, त्या लोकशाहीसाठी अत्यंत लाजिरवाण्या आणि चिंताजनक आहेत. निवडणूक निष्पक्ष होत नाही .झाली नाही. शक्ती प्रदर्शन, भीती आणि साधनांच्या असमान लढाईत ती परिवर्तीत झाली. अशी परिस्थिती म्हणजे ते केवळ राजकीय संकट नसून लोकशाही मूल्यांवर झालेले थेट हल्ले असतात.

आज नव्या प्रकारच्या दडपशाहीचा उदय झाला आहे. पूर्वी दडपशाही म्हणजे केवळ गुंडगिरी, धमकी किंवा स्थानिक दबदबा मानला जात असे, परंतु आता यामध्ये संस्थात्मक शक्ती, यंत्रणांचा दुरुपयोग, मीडियाचा प्रभाव, धनशक्ती आणि प्रचार यंत्रणेचा देखील समावेश झाला आहे. जेव्हा सत्ताधाऱ्यांच्या समर्थनार्थ अनेक संस्था सक्रिय दिसतात आणि विरोधी आवाज कमकुवत करण्यासाठी शक्य तो प्रत्येक मार्ग अवलंबला जातो, तेव्हा सामान्य नागरिकाच्या मनात या निवडणुका खरोखरच निकोप स्पर्धात्मक आहेत का किंवा होतात का असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे . सध्याच्या परिस्थितीत सर्वाधिक चर्चा पश्चिम बंगालची झाली आणि होत आहे. सर्वोच्च न्यायालया पर्यंत ही लढाई पोहचली असून न्यायालयाने सकारात्मक पवित्रा या निवडणुकी बाबत घेतलेला दिसतो.काहीही होऊ शकते अशी स्थिती निर्माण झालेली आहे.ही निवडणूक केवळ एका राज्याची नव्हती तर राष्ट्रीय राजकारणाचे केंद्र बनली होती. येथे प्रधानमंत्री, गृहमंत्री, अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आणि अनेक केंद्रीय मंत्री सतत तळ ठोकून होते, सभा, रोड शो, प्रचार मोहीम आणि शक्ती प्रदर्शन निरंतर सुरू होते.या निवडणुकीतील उधळपट्टी नंतर पंतप्रधानांनी देशाला बचतीचे धडे दिले ही बाब लक्षात घेण्या सारखी आहे.

प.बंगालच्या राजकारणात यावेळी अनेक विचित्र बदल पाहायला मिळाले. उदाहरणार्थ, जे पक्ष पूर्वी मांसाहाराच्या विरोधात होते,बोलत होते. शाकाहाराचे महत्व सांगत होते ते यावेळी बंगालची संस्कृती आणि जनतेशी नाते सांगण्यासाठी कॅमेऱ्यासमोर मासे आणि मांस खाताना दिसत होते.. राजकारणातील विचारधारेचा हा अचानक झालेला बदल केवळ निवडणूक डोळ्या समोर ठेऊन केलेला स्पष्ट होतो. सर्वात गंभीर विषय म्हणजे मतदार यादीतून नावे कापले जाण्याचा आहे. पहिल्या टप्प्यापूर्वी सुमारे लाख नावे यादीतून हटवण्यात आली, असा आरोप विरोधकांनी केलेला आहे . या मुद्द्यावरून लोकांनी आंदोलन केले, ते न्यायालयापर्यंत गेले, सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागितली, परंतु दिलासा मिळाला नाही. जर इतक्या मोठ्या संख्येने नागरिक मतदानापासून वंचित राहत असतील, तर ती केवळ प्रशासकीय चूक म्हणता येणार नाही, तर तो लोकशाहीच्या आत्म्यावर झालेला हल्ला समजावा. पहिल्या टप्प्यातच सुमारे लाखांहून अधिक लोक मतदान करू शकले नाहीत अशा तक्रारी समोर आल्या. पुढच्या टप्प्यांतही लाखो लोक मतदान करू शकलेले नाहीत, ज्या लोकांनी वर्षानुवर्षे त्याच मोहल्ल्यात, गावात, शहरात राहून कर भरला, समाज घडवला, मेहनत केली, तेच अचानक मतदानाच्या दिवशी नागरिकत्व आणि अधिकारांच्या प्रश्नांना सामोरे गेले ही बाब अतिशय वेदनादायक म्हणावी लागेल. मतदान करू न शकणाऱ्यांच्या डोळ्यात केवळ निराशा नाही, तर प्रश्न आहेत. ते म्हणतात की,आमचे पूर्वज इथेच राहिले, आम्ही इथेच जीवन व्यतीत केले, आम्ही तुमचे शेजारी आहोत, मग आजच आम्ही मतदार का नाही? आमच्या समोर आमचेच शेजारी मतदान करायला जात आहेत.असे त्यांचे संवाद असून ते वास्तव आहेत. अशा लोकांच्या नजरेला नजर भिडविणे सोपे नसते. त्यांच्या मनात अपराधी पणाची भावना ज्यांनी निर्माण केली ते कशी नजरेला नजर भिडवणार?

बंगालमधील निवडणुकीचे वातावरण यावेळी उत्सवासारखे कमी आणि युद्धासारखे जास्त वाटत होते. लाखो सुरक्षा रक्षक, मोठी वाहने, रस्त्यांवर होणारे संचलन, बुटांचे आवाज आणि सततचा तणाव - असे फारच गंभीर वातावरण केंद्र सरकारने निर्माण करून ठेवले होते.सर्व सामान्य नागरिकाच्या मनातील शांती हिरावून घेण्यात आली होती.पूर्वी निवडणुकीच्या दिवशी सुट्टी, गाठीभेटी, संवाद आणि मोहल्लयांमध्ये उत्सवाचे वातावरण असायचे. लोक नटून-थटून मतदान केंद्रावर जात, परत आल्यावर चहावर चर्चा करत, परंतु यावेळी बंदूक, भीती, कडक शिस्त आणि अस्वस्थतेने तो आनंद कमी झालेला दिसला.म्हणून कोणी कितीही सांगितले की, प.बंगालमध्ये नवी पहाट निर्माण झाली ते सगळे लाचार आहेत.लांगुल चालनात मश्गूल आहेत.जेव्हा निवडणूक आयोगा सारख्या संवैधानिक संस्थेवरही प्रश्न उपस्थित होऊ लागतात, तेव्हा परिस्थिती अधिक गंभीर होते. लोकशाहीत आयोगाची भूमिका निष्पक्ष आणि पंच म्हणून असली पाहिजे पण देशाचा निवडणूक आयोग सरकार पक्षाचा चाकर बनून वागला.त्यामुळे या यंत्रणेवरील विश्वास पूर्णपणे संपुष्टात आला.या निवडणुकीतील सर्वात मोठी विषमता साधनांची आहे. एका बाजूला केंद्राची सत्ता, मोठे नेते, धनशक्ती, मीडियाचा प्रभाव, प्रशासकीय शक्ती आणि व्यापक प्रचार यंत्रणा तर दुसऱ्या बाजूला एकटी महिला उभी होती. ती संघर्षातून वर आलेली आहे.वर्षानुवर्षे जनतेत राहून राजकारण केलेले आहे आणि प्रदीर्घ काळापासून मुख्यमंत्री आहे. हा सामना केवळ दोन पक्षांचा नसून शक्ती आणि जनसमर्थन यांच्यातील संघर्षासारखा दिसत होता. लोकशाहीचे सौंदर्य जनतेच्या निर्णयात असते.त्यासाठी लोक भीती मुक्त असले पाहिजेत तसे काही बंगालमध्ये दिसले नाही.

बंगालची जनता राजकीयदृष्ट्या जागरूक मानली जाते. येथील लोक विचार, संस्कृती, भाषा, अधिकार आणि सन्मानाला महत्त्व देतात. त्यामुळे केवळ प्रचार किंवा शक्ती प्रदर्शनाने जनतेला नेहमीच प्रभावित करता येत नाही. येथील मतदार शांत राहूनही खूप काही विचार करतो आणि मतदान केंद्रावर जाऊन आपला निर्णय देतो. पण यावेळी वेगळीच विचारधारा दिसली ती पूर्णपणे नासलेली होती.

अनेक पक्षांचे नेते आपली विचारधारा सोडून पक्ष बदलत असतात ते चित्र याही निवडणुकीत होते. बंगालमध्ये अनेक असे चेहरे आहेत की जे पूर्वी तृणमूल काँग्रेस, काँग्रेस, डावे पक्ष किंवा इतर पक्षांत होते, पण आता नवीन पक्षात सामील होऊन तत्त्वाचे नव्हे तर संधीचे राजकारण त्यांनी केले.महाराष्ट्रात ज्या प्रमाणे अनेकांनी तत्वांना मुरड घालून स्वतःला खुंट्याला बांधून घेतले आणि लाचार झाले तो रोग आता सगळीकडेच लागला आहे.यामुळे राजकारणाचे चरित्र कमकुवत झाले हे नव्याने सांगण्याची गरज नाही.जर लोटांगण घालायचेच होते तर वर्षानुवर्षे भाषणे कशासाठी दिली, असेही प्रश्न आता लोक विचारतात.दुसरीकडे, मीडियाचा एक मोठा भाग निवडणुकीचा हा तमाशा उत्सवासारखा दाखवण्यात मग्न होता.नेते गंगेच्या काठी फोटो काढून घेत आहेत, जिलेबी, झालमुडी, मासे खातानाची दृश्ये दाखवली जात आहेत, बंगालच्या संस्कृतीची चव घेतली जात आहे. लोकशाही हक्कापासून वंचित राहिलेल्या लोकांच्या वेदनांना मीडियामध्ये तितकी जागा मिळत नाही. मात्र नाटकी वागण्याचे उदात्तीकरण मोठ्या प्रमाणावर होते ही बाब लोकशाही साठी चिंताजनक आहे. जे लोक देश घडवतात, सीमेवर रक्षण करतात, शेतात अन्न पिकवतात, कारखान्यात काम करतात, कर भरतात, समाज चालवतात - जर तेच मतदानापासून वंचित राहिले, तर या सारखे दुःखद दुसरे काही नाही. अशी अनेक कुटुंबे आहेत ज्यांचे पूर्वज स्वातंत्र्यलढ्यात तुरुंगात गेले, त्यानी देशासाठी बलिदान दिले, पण आज त्यांच्या मुलांना व्यवस्था न्याय देत नाही. जनतेच्या मनात अशा लोकांबद्दल सहानुभूती आहे. सोबतच एक खंतही आहे की आपण सगळेच शांत का आहोत. ही शांतता लोकशाहीला हळूहळू कमकुवत करते. जेव्हा समाज अन्याय पाहूनही गप्प बसतो, तेव्हा संस्था अधिक निर्भय होतात.

राजकीय आवडीनिवडी च्या पलीकडे जाऊन लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्याची सध्याची काळाची हाक आहे. सरकारे येतील आणि जातील, पक्ष बनतील आणि विस्कळीत होतील, नेते बदलतील; परंतु संविधान, मतदानाचा अधिकार आणि जनतेचा विश्वास टिकून राहिला पाहिजे. हीच राष्ट्राची खरी शक्ती आहे. लोकशाही हे केवळ सत्ता परिवर्तनाचे साधन नसून नागरिकांच्या सन्मानाचा आधार आहे. जर नागरिकच असुरक्षित, दुर्लक्षित आणि मूक झाला, तर लोकशाहीचा सांगाडा उभा असूनही आतून पोकळ होतो. आज जागरूक नागरिकत्वाची गरज आहे. निष्पक्ष संस्थांची गरज आहे.सत्य आणि अहिंसेवर आधारलेली व्यवस्था उभी करण्याची गरज आहे. तरच निवडणुका पुन्हा उत्सवा सारख्या घेतल्या जाऊ शकतील. अन्यथा अराजक ठरलेले आहे.



## युवक मित्र संस्थेच्या निबंध स्पर्धांचे उनगराध्यक्षांच्या हस्ते बक्षीसांचे वितरण

**शहादा,दि.११(का.प्र.) - आजच्या युवकांनी चुकीच्या गोष्टींना बळी न पडता अभ्यासाला महत्त्व दिले पाहिजे. थोरामोठ्यांचा सल्ला घेऊन योग्य मार्गावर चालण्याचा प्रयतक केला तर आपण एक चांगला व्यक्ती म्हणून जीवन जगू शकतो,असे प्रतिपादन शहादा नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षा माधवीताई मकरंद पाटील यांनी केले.**

क्रांतीसूर्य महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती तसेच सामाजिक समता पर्वानिमित्त युवकमित्र परिवार, नंदुरबार या संस्थेमार्फत आयोजित जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले, त्याप्रसंगी सौ. पाटील बोलत होत्या.यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते माणिकभाई चौधरी, रमाशंकर माळी, अलकाताई जोंधळे, स्मिताताई सोनार, चंद्रमणी रायसिंग, वसीम शेख, प्रवीण महाजन आणि कल्पेश राजपूत उपस्थित होते.स्पर्धेतील विजेत्यांमध्ये खुला गट:आरती पाकळे (प्रथम), नयना माळी (द्वितीय), पूनम वळवी (तृतीय). शालेय गट:कार्तिका साळुंखे (प्रथम), संजना शिरसाठ (द्वितीय), श्रेया जमदाडे (तृतीय) यांचा समावेश होता.विजेत्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. संस्थेचे संस्थापक प्रवीण महाजन यांनी महापुरुषांचे विचार तळागाळात पोहोचवणे हा या स्पर्धेचा उद्देश असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे आभार कल्पेश राजपूत यांनी मानले.

## जैन कार्यकर्ता सक्षमीकरण प्रशिक्षण शिबीर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न

शिंदखेडा(वा.) भारतीय जैन संघटनेच्या(बीजेएस)४० वर्षाच्या इतिहासात प्रथमतः ग्राउंड लेव्हलच्या कार्यकर्त्यांसाठी कार्यकर्ता सक्षमीकरण प्रशिक्षण कार्यक्रम संस्थापक अध्यक्ष शांतीलाल मुथा यांच्या प्रेरणेने व मॅनेजिंग डायरेक्टर कोमल जैन यांच्या मार्गदर्शनाने दिनांक ७ मे २०२६ रोजी संध्याकाळी ५ ते ८ या दरम्यान आधी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करून २८८ पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यात सहभाग घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात नमस्कार महामंत्राने करून सुरुवातीला संघटनेच्या सामुदायिक विवाह कार्यक्रम ज्यात शांतीलाल मुथा यांच्या मुलांचा विवाह केला होता. त्यानंतर परिचय संमेलन, १९९३ मधील लातूर भूकंप,जम्मू कश्मीर अंदमान निकोबार, नेपाळ , मेळघाट येथील कामे, २०१८ मध्ये पाण्याच्या संदर्भात बुलढाणा येथे पायलट प्रोजेक्ट,२०२४ मध्ये भारतातील १०० शहरे जल पर्याप्त म्हणून पर्यंत घेतले, २०१९ पासून मूल्यवर्धन शिक्षण, गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार आदी कामांची माहिती कोमल जैन यांनी दिली.

यानंतर संघटना परिवार व नातेसंबंध, मूल्य आणि आचरण,प्राकृतिक संसाधनाचे रक्षण, शिक्षण विकास, नैसर्गिक आपत्ती, आरोग्य संपदा व भ्रमण या ७ बाबींवर काम करीत असल्याचे सांगितले.

संघटनेच्या बास्केटमध्ये वर्षभरातील १४फाउंडेशन कार्यक्रम याशिवाय स्मार्ट गर्ल,एमएसएमई,परिणय पथ,कपल एम्पॉवरमेंट आदी व नव्याने येत असलेल्या कार्यक्रमाची माहिती दिली. तसेच शाखखा म्हणजे काय,स्थापना कशी करावी, कार्यकारणी किती सदस्यांची असावी, आर्थिक नियोजन कसे करावे याबाबत ऊहापोह केला गेला. देशात बारा राज्यात संघटनेची कार्य असून एकूण १८९ शाखा व ५० हजार कार्यकर्ते आहेत.

राष्ट्रीय जनरल सेक्रेटरी पंकज चोपडा दिनेश पालरेचा, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष केतन शहा, राज्य महासचिव प्रवीण पारख,राज्य उपाध्यक्ष विनय पारख, राज्य सचिव, राज्य कार्यकारणी

खान्देश विभाग अध्यक्ष प्रा.चंद्रकांत डागा ,अशोक राखेचा,विभाग उप अध्यक्ष सुमित मुनोत, नंदुरबार जिल्हा अध्यक्ष अल्पेश जैन, मुख्य कार्यालयाकडून अमित ढाणे,अभिजीत पेटकर, विविध शाखांचे अध्यक्ष व सचिव उपस्थित होते.असे प्रशिक्षण नियमितपणे सुरू राहणार असल्याचे कोमल जैन यांनी सांगितले.

**NAME CHANGE**

MY OLD NAME WAS
**HEENA JAFAR KHATIK**
MY NEW & CORRECT NAME IS
**HEENA ANIS KHATIK**
**ADD-** KHATIK WADA, AT.PO.SHIRUD, DHULE-424308 (M.S.)
**FOR ALL PURPOSE.**

**NAME CHANGE**

MY OLD NAME WAS
**MANYAR UMME HABEEBA MUHAMMAD AYYUB**
MY NEW & CORRECT NAME IS
**UMME HABEEBA SHARIF MANIYAR**
**ADD-** HOUSE NO.3132, SWAMI NARAYAN CHAL, GALLI NO.2, DHULE-424001 (M.S.)
**FOR ALL PURPOSE.**

### पान १ वरुन

पान १ वरुन

## लामकानीत दहा लाखांचा काँक्रिटचा रस्ता

गावातील अंतर्गत रस्त्यांची दुरावस्था झाली होती. पावसाळ्यात चिखल व इतरवेळी धुळीचा त्रास सहन करावा लागत होता. या रस्त्याच्या काँक्रिटीकरणामुळे ग्रामस्थांची मोठी सोय होणार आहे. आमदार राम भदाणे यांनी ग्रामीण भागाच्या विकासाला नेहमीच प्राधान्य दिले असून नागरी सुविधा योजनेतून गावागावांत विकासकामे मार्गी लावली जात आहेत.

या प्रसंगी माजी उपसरपंच किशोर चौधरी, माजी ग्रामपंचायत सदस्य पुडलिक येवले, माजी ग्रामपंचायत सदस्य सुनील तलवारे, माजी पंचायत समिती सदस्य तुषार महाले, विठ्ठल मंदिर ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉ. वाय. टी. चौधरी, माजी उपसरपंच मनोहर येवले, सुरेश येवले, तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष प्रेमलाल जयस्वाल, माजी ग्रामपंचायत सदस्य अनिल बाविस्कर, माजी ग्रामपंचायत सदस्य प्रकाश पाटील, विकास सोसायटीचे चेअरमन बिपिन पाकळे, वना राऊळ, युवा कार्यकर्ते गुलाब धनगर, प्रविण येवले, चंपूशेठ वाणी, बापू येवले, युवा कार्यकर्ते चिनू पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नंदुरबार जि.संघ शिरपूरला रवाना



चैतन्य बोरसे, धुर्व जाधव, दक्ष माळी हे खेळाडू संघात जिल्हा चे प्रतिनिधित्व करतील, संघाचे प्रशिक्षक म्हणुन प्रफुल कडोसे आणि मॅनेजर योगेश कुंभार हे काम पाहतील.१३ मे पासून स्पर्धा सुरू होणार आहेत.

## डॉ.गावितांच्या प्रकृतीत सुधारणा

कठीण होता. मात्र कुटुंबीय, मित्र, हितचिंतक आणि कार्यकर्त्यांनी दिलेला आधार आम्हाला ताकद देणारा ठरला.

त्या पुढे म्हणाल्या, आज बाबा घरी परतल्यानंतर घरात पुन्हा आनंद आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. बाबा हे आमच्या कुटुंबाचा आधारस्तंभ आहेत. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याने देवाचे मनापासून आभार मानते.

दरम्यान, डॉक्टर विजयकुमार गावित यांच्या प्रकृतीत सातत्याने सुधारणा होत असल्याने समर्थकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

## पिकअपच्या धडकेने दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

मृत रावण पाटील यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले आणि एक मुलगी असा परिवार आहे. एकाच आठवड्यात गावातील दोन व्यक्तींचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्याने कवळीथ गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.शहादा-मंदाणा रस्त्यावर वाहनांची वर्दळ मोठी असते, मात्र येथे सुरक्षेच्या कोणत्याही उपाययोजना नाहीत. नागरिकांनी यापूर्वी अनेकदा या मार्गावर गतिरोधक बसवण्याची मागणी केली आहे, परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.अजून किती निष्पाप बळी घेतल्यावर प्रशासनाला जाग येईल? असा संतप्त सवाल आता नागरिक व अपघातग्रस्त परिवाराकडून विचारला जात आहे.

## लवांडे हल्ला प्रकरणी शिंदखेड्यात निषेध

यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा जाहीर निषेध करण्यात आला. यावेळी पक्षाचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र मराठे, ज्येष्ठ पदाधिकारी एन.सी. पाटील, शिंदखेडा शहराध्यक्ष प्रवीण विनायक पाटील, किसान सेलचे गुलाबराव पाटील, ओबीसी सेलचे डी. टी. पाटील, शांताराम पाटील, देविदास मोरे यशवंत पाटील, अरुण देसले, एल. डी. देसले, दिलीप पाटील, देविदास सनेर, प्रवीण मराठे, आनंदराव पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोदींचा आदेश: ताफ्यात गाड्या कमी करा जयंत पाटलांनी फडणवीसांना घेरले

**मुंबई, दि. १२ : आखाती देशातील युद्धामुळे देशावर उद्धवणारे संकट टाळण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी देशातील जनतेला काटकसर करण्याचे आवाहन केले आहे. त्यावर आता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील म्हणाले, मोदींचा आदेश मानून मुख्यमंत्र्यांनी आपल्यासह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी करावी, फक्त एक गाडी आणि एक अंगरक्षक देण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. पंतप्रधानांनी केलेले प्रत्येक आवाहन मध्यमवर्गीयांनी कर्तव्य म्हणून पाळले. थाळ्या वाजवायला सांगितल्या... वाजवल्या. दिवे लावायला सांगितले तेही लावले. आता युद्धजन्य परिस्थितीत पेट्रोल, डिझेल आणि गॅस कमी वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मध्यमवर्गासाठी काटकसर ही काही नवी गोष्ट नाही.**



कर्तव्य म्हणून सर्वसामान्य या वेळेला पण साथ देतील. पण २०-३० गाड्यांचा ताफा वापरणाऱ्या मंत्र्यांचे काय? असा प्रश्न जयंत पाटील यांनी उपस्थित केला आहे. राज्यात मुख्यमंत्र्यांपासून मंत्री, अधिकारी आणि हल्ली तर सत्ताधारी पक्षाचे आमदार डझनभर गाड्यांचा ताफा आणि सुरक्षा घेऊन फिरतात. प्रधानमंत्री महोदयांचा आदेश शीर्ष मानून आपणही आपल्यासह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या कमी करावी, फक्त एक गाडी आणि एक अंगरक्षक देण्यात यावा, अशी ागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. मध्यमवर्ग त्याग करायला तयार आहेच पण सत्ताधाऱ्यांनीही राष्ट्र प्रथम हे धोरण कृतीत उतरवावे असेही जयंत पाटील यांनी म्हटले आहे.

### आदित्य ठाकरे यांचाही हल्लाबोल

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनावर आदित्य ठाकरे यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. आपण सगळेच पहिल्या दिवसापासून बोलत आहोत की, आजच्या परिस्थितीवर त्यांनी बोलावे. आता पाच राज्यातील निवडणूक झाल्यावर ते बोलत आहेत, त्यांच्या मंत्र्यांचा ताफा कमी करणार का? जनतेने सर्व काही करावे तर सरकारने काय करावे, असा सवालही आदित्य ठाकरेंनी उपस्थित केला. तर, अमित साटम यांनी २५ गाड्यांचा ताफा घेऊन पाहणी केली. त्यावरुन, आदित्य ठाकरेंनी त्यांना टोला लगावला. स्वतः सोबत २५ गाड्या आणि कचरा काढणाऱ्या गाड्या किती? असा सवाल आदित्य यांनी विचारला. तसेच, यांना सगळ्या परवानगी दिल्लीतून घ्याव्या लागतात, असेही ते म्हणाले.




**NAME CHANGE**

MY OLD NAME WAS
**BARIRA NAAZ HAMID**
MY NEW & CORRECT NAME IS
**BARIRA NAAZ MUDASSIR NIYAZI**
**ADD-** HOUSE NO.3416/A, LANO NO.1, BAHISHTI WADA, DHULE-424001 (M.S.)
**FOR ALL PURPOSE.**

**NAME CHANGE**


MY OLD NAME WAS
**RABIYA BI GAFUR MANIYAR**
MY NEW & CORRECT NAME IS
**RABIYABI NIZAMUDDIN MANIYAR**
**ADD-** HOUSE NO.3132, SWAMI NARAYAN CHAL, GALLI NO.2, DHULE-424001 (M.S.)
**FOR ALL PURPOSE.**

प्रकाश में आज – हम से बढकर कौन




मिथुन, रंजीता, अमजद खान, डेनी, रणजीत, काजल, किरण

## शब्दकोडे क्रमांक : २३६२



**आडवे शब्द :** १. पहाट ३. आक्षेप ५. शिकार ७. धडा ८. हिंदीत-औषध ९. पवित्र १०. फुकट गेलेला वा बिनकामाचा १२. चोरी करणारा १४. ताडाच्या झाडापासून मिळणारे पेय १५. विस्मरण १६. बुद्धिबळातील एक डाव १७. अधम १८. देश २०. तलवारीचा जोडीदार २१. उपस्थित २२. तांदळाची एक जात २४. नाव २६. फटाका २७. अलमारी २९. लोभ ३०. एखाद्याविषयी मनात उमजणारी काळजी ३१. निःस्वार्थ देणगी ३४. ऐट ३५. माया ३७. वारसा चालवण्याची परंपरा ३९. पत्रातील मजकूर ४०. जड ४२. एक पाण्याचा स्त्रोत ४३. संगीत सप्तकातील तिसरा स्वर ४४. इराण्याच्या हॉटेलमध्ये मिळतो तो '** मस्का' ४५. पावसाची आतुरतेने वाट पाहणारा एक काल्पनिक पक्षी ४७. इंग्रजीत-कावळा

**उभे शब्द :** १. सरळ रेषेतला २. किनार ३. वारा ४. कलाकार सादर करतो ती ५. एक शेंगभाजी ५. इंग्रजीत-धाव ८. एखाद्याविषयी मनात असलेली कीव ९. एक लहान आकाराचा पक्षी १०. आळी ११. सरकार १३. शिवार नांगरण्यासाठी वापरतात तो प्राणी १४. ज्वर १५. वितरण करणारा १६. प्रेरणा १७. आदिवासी वसाहत १८. निगा १९. वस्तू २१. आक्षेप २२. किल्ला २३. थोर २५. चित्रीकरणासाठी प्रसिद्ध असलेले मुंबईच्या मालाड येथील एक ठिकाण २६. लहान मूल २८. मुखोद्गत ३०. कलाकार ३१. दैत्य ३२. ग्रामीण बोलीत सर्व ३३. निसर्ग ३५. चिंतन ३६. नायिका ३८. पारंबी वा फांदी ४१. धाक

### शब्दकोडे क्रमांक : २३६१ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रा | ची | | सा | क्ष | र | | झें | डा | | दि | वा |
| ण | | धो | र | ण | | ला | डू | | ज | न | क |
| | सौ | | ण | | खो | ल | | स | | क | डा |
| वे | त | न | | पा | त | | अ | व | ता | र | |
| | न | | का | ढा | | बा | | ल | स | | टी |
| आ | | क्षा | र | | ब | र | क | त | | ह | |
| र | वी | | भा | ला | | का | ळी | | ज | मी | न |
| सा | | नी | र | | छा | वा | | क | म | | र |
| | सा | ल | | सं | प | | न | ष्ट | | का | डी |
| पा | व | | रं | ग | | पो | ट | | ख | च | |
| म | ली | न | | त | डा | | रं | ग | त | | पो |
| र | | ग | ती | | स | र | ग | म | | सा | त |

## पान १ वरुन

### नीट पेपरफुटी नंतर परीक्षा रद्द करण्याचा निर्णय

ताब्यात घेण्यात आले असून त्याची कसून चौकशी सुरू आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नाशिक पोलिसांनी आरोपीचे नाव, मोबाईल नंबर आणि पत्त्याच्या आधारे त्याचा शोध घेत अटक केली. संबंधित युवकाची मेडिकल काऊन्सलिंग एजन्सी आहे. नीट प्रकरणातील पेपरफुटी प्रकरणानंतर आरोपीने पोलिसांपासून बचावासाठी हेअरस्टाईल बदलल्याचे प्राथमिक तपासातून उघड झाले आहे. दरम्यान, राजस्थान पोलिसांमार्फत एका संशयित ताब्यात घेण्यात आले, अशी माहिती सकाळी देण्यात आली होती. केंद्रीय तपास पथकाच्या ताब्यात आम्ही आरोपीला देणार आहोत. त्याने हेअर स्टाईल बदलेली होती. मात्र, पोलिसांनी शिताफिने त्याला ट्रेस केल्याचे पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

**नाशिकमधून प्रश्नपत्रिका हरियाणात**

पेपर लीक प्रकरणात महत्त्वाची माहिती समोर आली असून प्रश्नपत्रिका लीक झाल्यानंतर पहिली कॉपी नाशिकमध्ये समोर आली. नाशिकमधील ही लीक प्रश्नपत्रिका हरियाणात पोहोचली. येथे फुटलेल्या पेपरचे १० सेट तयार करण्यात आले. त्यानंतर, हरियाणातून बिहार, आंध्र प्रदेश, जम्मू आणि काश्मीरपर्यंत नीटची प्रश्नपत्रिका सहजपणे पोहोचल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यामुळे, नीट परीक्षेसाठी काम करणाऱ्या संस्था आणि एजन्सीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दरम्यान, नीट पेपर फुटीच्या प्रकरणाचा तपास आता देशातील सर्वात सक्षम तपास यंत्रणा असलेल्या सीबीआयकडे देण्यात आला आहे.

**राजस्थानमध्ये १३ जणांचा चौकशी**

सीबीआयकडून हे प्रकरण गंभीर्याने घेण्यात आले असून तातडीने कारवाईची चक्रे फिरली आहेत. आतापर्यंतच्या तपासानुसार, जयपूरमध्ये अटक करण्यात आलेला मनीष हाच या संपूर्ण प्रकरणामागील मुख्य सूत्रधार असल्याचे दिसून येते. प्रश्नपत्रिका छपाईला जाण्यापूर्वीच, परीक्षेतील संभाव्य प्रश्न मिळवून त्याने हे कांड केले. तीन मे रोजी पार पडलेल्या परीक्षेदरम्यानच ही प्रश्नपत्रिका फुटल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी लवकरच पुढील कारवाई सुरू करेल अशी अपेक्षा आहे. सध्या राजस्थानच्या ताब्यात असलेल्या १३ व्यक्तींची चौकशी करणार आहे. दरम्यान, परीक्षेला देशभरातून २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. मात्र, आता ही परीक्षा आता रद्द करण्यात आली आहे.

**तीन मेची परीक्षा रद्द**

वैद्यकीय प्रवेश परीक्षा नीट-यूजी-२०२६ गेस पेपर फुटल्याच्या आरोपांनंतर रद्द करण्यात आली आहे. या घडामोडीने एकच खळबळ उडाली आहे. तीन मे रोजी झालेल्या परीक्षेच्या विश्वासार्हतेबद्दल केंद्रीय यंत्रणांकडून चिंता व्यक्त झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे लाखो विद्यार्थी प्रभावित झाले असून, सरकारने आता हस्तक्षेप करत सीबीआय चौकशीचे आदेश दिले आहेत आणि व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी फेरपरीक्षेची घोषणा केली. राष्ट्रीय परीक्षा संस्थेने आरोपांच्या सखोल चौकशीसाठी हे प्रकरण केंद्रीय अन्वेषण विभागाकडे सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. एनटीए विभागाला पूर्ण सहकार्य करेल आणि चौकशीसाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य, नोंदी आणि सहाय्य प्रदान करेल. कोणतीही नवीन नोंदणी आवश्यक असणार नाही आणि कोणतेही अतिरिक्त परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही. याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांनी यापूर्वी भरलेले शुल्क त्यांना परत केले जाणार आहे आणि एनटीएच्या अंतर्गत संसाधनांचा वापर करून परीक्षेचे पुनर्नियोजन केले जाईल. पुनर्नियोजित परीक्षेच्या तारखा आणि पुन्हा जारी केलेल्या प्रवेशपत्राच्या वेळापत्रकासह पुढील माहिती संस्थेच्या अधिकृत माध्यमांद्वारे दिली जाणार आहे. नव्या परीक्षेची तारीख लवकरच जाहीर होईल, त्यासाठी परीक्षार्थींचे परीक्षा केंद्र तीन मे रोजीचेच राहणार असून विद्यार्थ्यांना नव्याने रजिस्ट्रेशन करण्याची गरज नाही. विद्यार्थ्यांकडून नव्या परीक्षेसाठी शुल्क घेतले जाणार नाही. मात्र नव्या परीक्षेसाठी नवे ओळखपत्र दिले जाणार आहे. विद्यार्थी, पालकांनी फक्त एनटीएच्या सूचनांवर लक्ष ठेवावे, असे आवाहन केंद्राकडून करण्यात आले आहे.

**चारशे सदस्यांचा सोशल मिडीया ग्रुप**
**हस्तलिखीत प्रश्नपत्रिका सापडली**

केंद्रीय अन्वेषण ब्युरोने यावर्षीच्या राष्ट्रीय वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील कथित पेपरफुटीप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे, असे या संस्थेने मंगळवारी सांगितले. ही परीक्षा देशातील सर्वात स्पर्धात्मक एमबीबीएस विद्यापीठ प्रवेश परीक्षा आहे. उच्च सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संस्थेला चारशे सदस्य असलेला एक सोशल मीडिया ग्रुप सापडला आहे, जेथे नमुना प्रश्नपत्रिका शेअर केल्या जात होत्या. या प्रश्नपत्रिकांमधील सुमारे सत्तर टक्के प्रश्न नीट परीक्षेत आलेल्या प्रश्नांसारखेच होते. संस्थेने सांगितले की, राजस्थान पोलिसांच्या विशेष कृती गटाने केलेल्या तपासात एक हस्तलिखित अंदाजाची प्रश्नपत्रिका सापडली आहे, जी बहुधा २८१ प्रश्नांची एक नमुना किंवा सराव प्रश्नपेढी आहे. यापैकी १३५ प्रश्न तीन मे रोजी झालेल्या नीट परीक्षेत आलेल्या प्रश्नांशी जुळणारे होते. भारताच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत असलेल्या उच्च शिक्षण विभागाकडून लेखी तक्रार आल्यानंतर केंद्रीय तपास संस्थेने हा गुन्हा दाखल केला, असे संस्थेने एका निवेदनात म्हटले आहे. यात भारतीय न्याय संहिता कायद्यातील तरतूदी, आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंध कायदा आणि सार्वजनिक परीक्षा गैरव्यवहार प्रतिबंध कायद्यातील तरतूदीनुसार गुन्हा दाखल करून तपास केला जाणार आहे.

### विद्यार्थ्यांच्या भविष्याचा मोदींकडून खेळ : गांधी

पेपर माफिया सुटून जातात आणि त्याची शिक्षा मात्र मेहनती विद्यार्थ्यांना भोगावी लागते. अशा घटनांमुळे देशातील शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास सतत ढासळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

**पुन्हा मानसिक आणि आर्थिक ताण**

परीक्षा रद्द झाल्यामुळे आता विद्यार्थ्यांना परीक्षेची पुन्हा तयारी करावी लागणार, मानसिक तणाव सहन करावा लागणार आहे. तसेच त्यांच्यावरील आर्थिक भार वाढणार असून भविष्यासंदर्भात अनिश्चितता निर्माण होणार असल्याचं राहुल गांधी म्हणाले. जर शिक्षणात मेहनतीपेक्षा पैसा आणि प्रभाव अधिक महत्त्वाचा ठरत असेल, तर गुणवत्तेचे महत्त्वच संपुष्टात येईल, असं म्हणत राहुल गांधींनी अनेक प्रश्न उपस्थित केले.

**सरकारच्या अमृतकालवर टीका**

राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर थेट निशाणा साधत म्हटले की, सरकार ज्या काळाला अमृतकाल म्हणते, तोच देशातील तरुणांसाठी विषकाल ठरत आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यात सरकार अपयशी ठरल्याचा आरोप त्यांनी केला.

### अण्णा द्रमुकमध्ये फूट, षण्मुगम गटाचा टीव्हीकेला पाठिंबा

अनेक वर्षांपासून आमचे राजकारण हे डीएमकेच्या विरोधात राहिलेले आहे. दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या निकालांनंतर डीएमकेच्या पाठिंब्याने अण्णा द्रमुकचे सरकार स्थापन करण्यात यावे, असा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. मात्र आमच्या बहुतांश सदस्यांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला आणि त्याला विरोध केला, असे त्यांनी सांगितले.

अण्णा द्रमुक पक्षाने एनडीएच्या माध्यमातून भाजपा आणि इतर छोट्या पक्षांसह मिळून तामिळनाडू विधानसभेची निवडणूक लढवली होती. मात्र टीव्हीकेच्या लाटेत अण्णा द्रमुकचा दारुण पराभव झाला. तसेच पक्षाला केवळ ४७ जागाच मिळाल्या आणि पक्ष तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला.

### हाडाखेडला प्लायवूडचा ट्रक जळून खाक

अचानक आग लागली. वारा वाहत असल्याने आग लगेचच पसरली. ट्रकच्या मागील भागात प्लायवूड भरलेले असल्याने त्यानेही पेट घेतला. काही क्षणातच ट्रकची राख रांगोळी झाली. या घटनेबाबत माहिती मिळताच सांगवी ठाण्याचे पोलीस आणि हायवे पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी सुचित केल्यानंतर शिरपूर येथील अग्निशमन दलाचा बंब घटनास्थळी पोहोचला. त्यांनी आग आटोक्यात आणली. याबाबत सांगवी तालुका पोलीस ठाण्यात दुर्घटनेची नोंद करण्यात आली.

## पान १ वरुन

### विहीर अनुदानासाठी सात हजाराची लाच घेणारा अटकेत

रूपयांचे अनुदान मिळावे म्हणून संबंधीत महिला शेतकऱ्याच्या दिराने पाच मेस तांत्रिक सहाय्यक विश्वजीत भामरे यांची भेट घेतली होती. त्यावेळी विहीरीच्या खोदकामाचे मोजमाप पुस्तक शाखा अभियंता आणि उपअभियंता यांच्याकडे पाठवावे लागेल. मंजूरी म्हणून त्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्याचा प्रस्ताव पाठवावा लागेल. त्यासाठी सात हजार रूपये लागतील, अशी मागणी भामरे याने केली. त्यानंतर संबंधीताने लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडे तक्रार केली. विभागाने पंचायत समितीच्या आवारात सापळा रचला आणि लाचेची रक्कम स्विकारताना भामरे यास अटक केली. विभागाचे पोलिस निरिक्षक यशवंत बोरसे, निरिक्षक पद्मावती कलाल, कर्मचारी राजन कदम, मुकेश अहिरे, संतोष पावरा, प्रविण मोरे, मकरंद पाटील, प्रविण पाटील, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, चंद्रकांत सैंदाणे, सागर माळी, महिला कर्मचारी रेश्मा परदेशी यांचा सापळ्यात समावेश होता. त्यांनी संशयित विश्वजित भामरे यास रक्कमेसह अटक केली.

### चुका तुमच्या, त्याचा भुर्दंड जनतेला का?

थेट मोदींना, त्यांच्या सहकाऱ्यांना आणि गेल्या वर्षांतील त्यांच्या कार्यावर प्रश्न उपस्थित केले आहेत.

**लाडकी बहीण योजनेने मोडकळीस**

ज्या रेवडी संस्कृतीची पंतप्रधानांनी खिल्ली उडवली त्याच रेवड्या मग २०२४ ची महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक असो की त्यानंतरच्या बिहार, पश्चिम बंगालच्या निवडणुका असोत की इतर कुठल्याही निवडणुका रेवड्या वाटूनच निवडणुका जिंकल्यात. महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेने राज्याची अर्थव्यवस्था मोडकळीला आणली. महिलांना सक्षम करायचे सोडून त्यांना तुटपुंजे पैसे द्यायचे आणि ते पैसे महागाईच्या रूपाने पुन्हा काढून घ्यायचे. देशाची आणि राज्याची अर्थव्यवस्था जर नाजूक झाली आहे तर या रेवड्या वाटू नका असे पंतप्रधान ठामपणे सांगणार आहेत का ?

**निवडणुकांत पेट्रोल-डिझेलचा अपव्यय**

पेट्रोल, डिझेलच्या वापरात काटकसर करा, असे पंतप्रधान सांगतात. ठीक आहे. मग हे आत्ताच का सुचले? पश्चिम बंगाल, आसाम, तामिळनाडू, केरळ आणि इतर राज्यांच्या निवडणुकीत प्रचार, रोड-शो करताना आणि देशभरातून लाखो माणसे त्या-त्या राज्यात नेताना जे कोट्यवधी लिटर्स पेट्रोल-डिझेल वाया गेले. तेव्हा का नाही सुचले? या राज्यांमध्ये जो अफाट पैशाचा खेळ करून मतदान मिळवले तेव्हा का नाही सुचले?

**तुमची मन की बात खूप झाली**

माझी पंतप्रधानांना विनंती आहे की, नैतिक आवाहन आणि त्याचा भार लोकांनी सहन करायचा हे सगळे बास झाले. एकदा मान्य करूया की, अर्थव्यवस्था वरून सुदृढ आणि आतून कमकुवत झाली आहे आणि यांचे नुसते खापर इराण-इस्रायल युद्धावर टाकू नका. तुमच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात रिझर्व्ह बँकेच्या तीन गव्हर्नर्सनी राजीनामे दिले ते का दिले? मनमोहन सिंग हे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर होते तसेच विद्वान होते तरीही ते अनेक तज्ज्ञांबरोबर बसून चर्चा करायचे, ऐकून घ्यायचे. आपण तर साधा व्यवसाय सुद्धा केलेला नाहीत तर आपल्याला हे कसे समजणार? तुमची मन की बात खूप झाली. आता खऱ्याखुऱ्या अर्थतज्ज्ञांची मन की बात पण ऐका, असा सल्ला राज ठाकरेंनी दिला आहे. देशावर आलेल्या संकटावर मात करण्यासाठी पुढे तुम्ही काय पाऊले उचलणार आहात हे जनतेला सांगा. संसदेला सांगा. तसेही हवे तेव्हा विशेष अधिवेशन घेण्याची प्रथा पडली आहेच. त्यामुळे संसदेचे विशेष अधिवेशन घेऊन ही परिस्थिती का आली आहे, यावर सगळ्यांना उत्तर द्या. असे स्पष्टपणे राज ठाकरेंनी आपल्या पत्रातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना म्हटले आहे

### शिरपुराला एकास बावीस ह. लुबाडले

कार्डची हात चलाखीने अदलाबदल केली. काही वेळाने राजपूत यांच्या कार्डचा वापर करून संशयितानी शिरपूर बस स्टॅन्ड समोरील एटीएम मधून २२ हजार रुपये काढून घेतले. दोघांविरोधात शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### हिरे मेडिकलची पहाणी करून समस्या सोडवा

व कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन बरेच गाजले होते. सदर वरिष्ठ कर्मचाऱ्यांच्याही गंभीर तक्रारी असून प्रशासनातील मुंबई येथील वरिष्ठ यंत्रणा त्यांना पाठीशी घालत असते. शिवाय या ठिकाणी नेमण्यात आलेले काही डॉक्टर्स कामचुकारपणाही करत असतात. वैद्यकीय महाविद्यालयात सुरू असणारे विकास कामे याची गुणवत्ता ही तपासण्याजोगी असल्याने मा. मंत्री महोदयांनी या रूग्णालयाची पहाणी करून आढावा घ्यावा, अशा प्रकारची मागणी प्रा. डॉ. पाटील यांनी मंत्र्यांच्या मुंबई येथील भेटीत निवेदनाद्वारे केली. हिरे वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या समस्या असून या बाबतही मंत्री महोदयांनी आढावा घेवून शिक्षणाच्या दर्जा बाबत मार्गदर्शन करावे, श्रीमती अरूणा भराडे यांच्या बाबतच्या चौकशी अहवाला बाबत तात्काळ निर्णय घेवून त्यांची बदली करावी, अशाही मागण्या प्रा. डॉ. पाटील यांनी मंत्री महोदयांकडे केल्या आहेत. लवकरच मंत्री महोदयांचा दौरा निश्चीत झाला असून या बाबतच्या समस्यांचे निवेदन धुळे शहरातील जागरूक नागरीकांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार पक्षाच्या कार्यालया कडे पाठवावे अशी विनंती माजी आमदार प्रा. डॉ. शरद पाटील यांनी केली आहे.

### लाच देणे-घेणे गंभीर गुन्हा- सीबीआय

पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत बैठका घेतल्या. यावेळी लाचखोरीसंदर्भातील कायदे, तक्रार प्रक्रिया तसेच नागरिकांनी घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

शासकीय कार्यालये, केंद्र व राज्य शासन विभाग, राष्ट्रीयकृत बँका तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये अधिकारी किंवा कर्मचारी कामासाठी लाचेची मागणी करत असल्यास नागरिकांनी थेट सीबीआयकडे तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले. यासाठी ९१७५०२२२५० या क्रमांकावर संपर्क साधण्यास सांगण्यात आले आहे. नंदुरबार जिल्ह्यात पुढील चार ते पाच दिवस विविध ठिकाणी बैठका, संवाद कार्यक्रम आणि जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. व्यापाऱ्यांच्या बैठकीला व्यापारी बाजार समिती संचालक गिरीश जैन, किशोरभाई वाणी, संजय अग्रवाल, मनीष अग्रवाल, ओम खंडेलवाल, अशोक चौधरी, प्रकाश अग्रवाल, वीरेंद्र वाणी, शुभम अग्रवाल, गौरव अग्रवाल, कौशल महेश्वरी, कृष्णा अग्रवाल आणि मनीष लुणावत उपस्थित होते. पुणे विभागांतर्गत एकूण १८ जिल्ह्यांमध्ये ही जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असून त्यात पुणे, सातारा, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, नंदुरबार, धुळे, जळगाव, संभाजीनगर, अहिल्यानगर, जालना, बीड, हिंगोली, परभणी, नांदेड, लातूर, धाराशिव आणि नाशिक जिल्ह्यांचा समावेश असल्याचे सहाय्यक पोलीस अधीक्षक आर.एन. प्रसाद यांनी सांगितले.

### रोटरी फेमिनातर्फे शवपेटीचे लोकर्पण

उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार असून समाजसेवेच्या कार्यात रोटरीचे योगदान नेहमीच उल्लेखनीय राहिले असल्याचे उपस्थित मान्यवरांनी यापै सांगितले. ही शवपेटी विनामूल्य आयुर्वेद महाविद्यालय देवपूर धुळे येथे उपलब्ध असणार असे संयोजकांनी सांगितले आहे.

### कृषी उत्पादकांना दरवाढ मिळण्याची शेतकऱ्यांना अपेक्षा

होत आहे. बाजार समितीचे संचालक विजय चिंचोले यांनी दिलेल्या माहिती नुसार, सध्या भुईमुगास सात हजार २०० ते सात हजार ८५० रूपये प्रति क्विंटल दर देण्यात येत आहे. ओल्या भुईमुगास पाच हजार पाचशे ते सहा हजार रूपये दर आहे. कोरडा मका एक हजार ९०० ते एक हजार ९६० रूपये क्विंटल, ओला मका एक हजार ७५० तर एक हजार ८७५ रूपये दराने खरेदी-विक्री होत आहे. बाजरी दोन हजार ५० ते दोन हजार दोनशे पन्नास रूपये क्विंटल या दराने खरेदी-विक्री होत आहे. ज्वारीस एक हजार ९५० ते दोन हजार १५० रूपये दर आहे. शेती मालाच्या दर्जावर भाव कमी-जास्त होतात. उन्हाळी हंगामातील इतर पिकांची लागवड कमी असल्याने, सध्या बाजार समितीत केवळ उन्हाळी बाजरी, मका, ज्वारी आणि भुईमूग या पिकांचीच आवक आहे, असे बाजार समितीचे संचालक विजय चिंचोले यांनी सांगितले.

## पान १ वरुन

### हिमंता बिस्वा सरमांकडे आसामचे मुख्यमंत्रीपद

२०१६ मध्ये भाजपच्या नेतृत्वाखाली पहिल्यांदा सर्वानंद सोनोवाल मुख्यमंत्री झाले होते, तर २०२१ मध्ये हिमंता बिस्वा सरमा यांनी राज्याची सूत्रे हाती घेतली होती. हा शपथविधी सोहळा अत्यंत खास मानला गेला. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्याशिवाय एनडीए शासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री सहभागी झाले होते.

**सरमा यांचा राजकीय प्रवास**

हिमंता बिस्वा सरमा २०१५ मध्ये कॉंग्रेस सोडून भाजपमध्ये दाखल झाले होते. त्यावेळी आसाममध्ये कॉंग्रेसचे वर्चस्व होते आणि भाजपकडे केवळ पाच आमदार होते, परंतु हिमंता सरमा यांनी ईशान्य भारतात भाजपला मजबूत करण्यासाठी धोरणात्मकरीत्या काम केले. भाजपने त्यांना २०१६ मध्ये नॉर्थ ईस्ट डेमोक्रेटिक अलायन्सचे निमंत्रक बनवले. त्यानंतर त्यांनी ईशान्येतील प्रादेशिक पक्षांना भाजपसोबत जोडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. राजकीय विश्लेषकांच्या मते, ईशान्य भारतात भाजपचा वेगाने वाढणारा प्रभाव यामागे हिमंता बिस्वा सरमा यांची रणनीती हे सर्वांत मोठे कारण आहे. सरमा यांचे शिक्षण गुवाहाटीमध्येच झाले. त्यांनी शालेय शिक्षण कामरूप अकादमीतून पूर्ण केले. त्यानंतर कॉटन कॉलेजमधून राज्यशास्त्र विषयात बी.ए. आणि एम.ए.ची पदवी घेतली. पुढे गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमधून एल.एल.बी. पूर्ण करून काही काळ गुवाहाटी उच्च न्यायालयात वकिलीही केली.

**खानापारा येथे भव्य सोहळा**

गुवाहाटीच्या खानापारा येथे शपथविधी मुख्यमंत्रीपदाच्या शपथविधी सोहळ्यासाठी विशेष तयारी करण्यात आली होती. एक लाखांहून अधिक लोक या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार झाले. सुरक्षेच्या कारणास्तव, संपूर्ण गुवाहाटीमध्ये कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली होती. केंद्रीय आणि राज्य पोलिस दल प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून होते.

### आत्महत्येस प्रवृत्त केले अटकपूर्व अर्ज नामंजूर

केले होते.आरोपी शशिकांत निंबा लोखणे व भावेश शशीकांत लोखणे यांनी मे. सत्र न्यायालय धुळे येथे अटकपूर्व जामीन अर्ज केलेला होता. सदरील जामीन अर्जात सरकार पक्षातर्फे ॲड. पराग पाटील यांनी कामकाज पाहिले. दोन्ही आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज मे. सत्र न्यायाधीश जयश्री पुलाटे मॅडम यांनी नामंजूर केला.

### हिरे शासकीय रूग्णालयात उष्माघात नियंत्रण कक्ष कधी

उपचार करून घ्यावे लागतात. जबाबदार असलेले डॉक्टर रूग्णालयात का थांबत नाही, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. अस्थीरोग उपचार कक्ष चौथ्या मजल्यावर असून लिफ्ट बंद आहे. त्यामुळे दाखल होतानाच रूग्णालस कसरती कराव्या लागतात. या ठिकाणी सहाय्यभूत साहित्य नाही, मदतीसाठी कर्मचारी नाही, अशी स्थिती आहे. स्त्रीयांच्या उपचाराची व्यवस्था तिसऱ्या मजल्यावर करण्यात आली आहे. स्त्रीयांना उपचार घेण्यापुर्वीच त्रास सहन करावा लागतो. सुपर स्पेशलिटी सुविधा देऊ असे सांगितले जाते. पण, डॉक्टर कोण आहेत याबाबत रुग्णांना माहिती मिळत नाही. डॉक्टर केव्हा येतात याबाबत रुग्णांना माहिती दिली जात नाही. त्यामुळे रूग्ण ताटकळत बसतात. न्यूरो सर्जन, न्यूरो फिजिशियन कधीच वेळेवर उपस्थित राहत नाहीत. टू-डी इकोसाठी रूग्ण दिवसभर ताटकळत बसतात. पण, विभागाचे डॉक्टर वेळेवर येतच नाहीत. रुग्णालयाच्या बाह्य आवारात स्वच्छता दिसत असली तरी आत घाणीचे प्रचंड साम्राज्य आहे. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीक्षक डॉ. अजित पाठक यांना यावेळी निवेदन देण्यात आले. तेव्हा जिल्हा प्रमुख अतुल सोनवणे, महानगर प्रमुख धीरज पाटील, प्रशांत ठाकूर, पंकज भारस्कर, सुभाष मराठे, मुन्ना पठाण, दिनेश पाटील,गोकुळ बडगुजर, इशतियाक अंन्सारी, तेजस सपकाळ, प्रमोद बागुल उपस्थित होते. अधीक्षक अजित पाठक यांनी जागेच्या अभावी उष्माघात नियंत्रण कक्ष मेल मेडिसिन वार्डात दोन बेडची पूर्तता करून करण्यात आला आहे. लवकरच स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात येईल. अनुपस्थित राहणाऱ्या डॉक्टरांना नोटीस बजावण्यात येईल. खालच्या मजल्यावर अस्थिरोग आणि स्त्रीरोग विभाग नव्याने तयार करण्यात येईल असे आश्वासन दिले.

### काशिराम पाटील यांचे निधन

नंदुरबार तालुक्यातील आसाणे येथील निंबा काशिराम पाटील, दादाभाई काशिराम पाटील व पंढरीनाथ काशिराम पाटील यांचे वडील काशिराम सिताराम पाटील वय ८० यांचे आज दि. १२ राजी निधन झाले. वृद्धप काळाने निधन झाले अंत्ययात्रेत समाज बांधव व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गुरुकृपा पेपर्स**

आमच्याकडे सर्व कंपनीचे झेरॉक्स पेपर, कलर पेपर, बॉन्ड पेपर, लेजर पेपर, फोटो पेपर, लॅमिनेशन शिट, स्पायरल शिट, ओ.एच.पी, ऑफिस फाईल, पट्टी फाईल, लॅमिनेशन मशिन व स्पायरल मशिन योग्य दरात मिळेल.

B2b A4 - 2050 Box

गुरुकृपा पेपर ॲन्ड झेरॉक्स
बँक ऑफ महाराष्ट्र देवपूर शाखेसमोर
पंचवटी देवपूर धुळे
7620455630 / 9421471926

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर कामासाठी माणूस पाहिजे.
-: संपर्क :-
पत्ता : ग.नं.५, हिंदुएकता चौक, धुळे
9404344999
9588418856

**होम ट्यूटर**
घरी येऊन क्लास (ट्यूशन) घेतले जाईल.
-: विषय :-
Physics, Maths, Chemistry, Biology Science
5 th to 12 th
-: संपर्क :-
प्रो.जितेंद्र निकम
9665173176
9637566046

**विकणे आहे**
ऊसगल्ली मध्ये १३X५५ फुटचा जागा विकणे आहे.
7020469216

**WANTED**
Require 2 Pharmacist
Part or Full Time
Gents or Ledies
9823833108

**पाहिजेत**
मॅनेजर - (कॉम्प्युटर ज्ञान व अनुभव आवश्यक)
समक्ष भेटा
हॉटेल पृथ्वीराज
परमिट रुम & बिअर बार
दत्त मंदिराचे पाठीमागे
विद्यानगर, देवपूर धुळे
9422786239

**पाहिजे**
हॉटेल कामासाठी मॅनेजर व वेटर पाहिजे. समक्ष भेटा!
हॉटेल राधिका
वाडीभोकररोड, धुळे
8857027090

**पाहिजेत**
श्री सिद्धेश्वर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, धुळे
सेक्युरिटी गार्ड -
सफाई कर्मचारी - (महिला)
वार्डबॉय -
hr@siddheshwarhospital.com
Mr.Swapnil Bhavsar-8888807582
Mr.Ramakant khalane- 8888873806

**मनमाड इंदौर रेल्वे मार्ग व नॅशनल हायवे जवळ असणारा प्लॉट विकणे आहे**

मनमाड इंदौर रेल्वे मार्ग व सुरत नागपूर नॅशनल हायवेचा फागणे परिसराचा विकास झपाट्याने होत आहे. फागणे सौंदाणे रोडवर एकाच ठिकाणी व एकाच व्यक्तीच्या मालकीचा ३० (तीस) लाख चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.

-: वैशिष्ट्ये :-
- प्लॉट जवळ धरण असल्यामुळे मुबलक पाणी मिळेल.
- धुळे शहरापासुन पंधरा मिनीटात पोहचणे शक्य. फागणे रेल्वे स्टेशनला जवळ.
- मुंबई आग्रा महामार्गाकडून धुळे बायपासने पंधरा मिनीटात पोहचणे शक्य.
- भरपूर ऑक्सिजन देणारा परिसर असल्याने ले-आऊट टाकण्यासाठी उपयुक्त.
- भक्य मालाचा डेपो (सेंट्रल गोडावून) साठी उपयुक्त.
- शाळा कॉलेजच्या कॅम्पसाठी उपयुक्त अशी जागा विकणे आहे.

सुयश गोल्डन सिटी
फागणा, धुळे-४२४३०१
परिवार फागणा सौंदाणे रोड
फागणा, मुंबई वाल्यांचा मळा
09867385827
09930454253

**पाहिजेत**
कामासाठी माणुस लावणे आहे.
भाग्यश्री कृषी सेवा केंद्र
पारोळा रोड, प्रकाश टॉकीज समोर, धुळे
-: संपर्क :-
9423135555

**पाहिजेत**
हिंगोली येथे वृद्ध महिला पेशंटचा देखभाल करणेसाठी महिला कर्मचारी पाहिजे.
(२ महिनेसाठी)
पगार- २०,०००/-महिना
राहणे + खाने सहित
संपर्क
9850279633

**विकणे आहे**
रामचंद्र नगरला लागुन दोन रस्त्यांच्या कॉर्नरचा ४००० स्केअर फुटाचा प्लॉट विकणे आहे.
सुरेश चौधरी
9422286235

**आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...**

atomberg "Why not?"



**क्या आप जानते हैं**
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं ?
इंडक्शन मोटर वह मोटर है,जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॉट बिजली की खपत होती हैं.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती हैं. इनसे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे 3* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरुरत नहीं होती है !

SAVES UP TO ₹1500 IN A YEAR
100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE

59 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor **श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.**
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०